# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

## वार्षिक अहवाल
## २००५ - २००६

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

## पाचवा वार्षिक अहवाल

## २००५—२००६

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना | (पाच) |
| १ | प्रास्ताविक | १ |
| २ | रचना | १ |
| ३ | आयोगाने हाताळलेल्या तक्रारी | २ |
| ४ | तक्रारीचे स्वरूप | ३ |
| ५ | स्वयंखुद्द दखल घेतलेली प्रकरणे | ४ |
| ६ | कैदेतील मृत्यू संबंधी | ६ |
| ७ | अटक झालेल्या व्यक्तींचे अधिकार | ७ |
| ८ | उप-समितीची रचना | ७ |
| ९ | आकस्मिक भेट | ८ |
| १० | निरीक्षण आणि निर्देश | ८ |
| ११ | प्रशासकीय व न्यायिक सहाय्य | ११ |
| १२ | आयोगाने निर्णय दिलेल्या दृष्टान्युक्त प्रकरणे | १३ |

## प्रस्तावना

नागरी समाज व्यवस्थेत नागरिकांचे हक्क सुरक्षित राखले जातात व स्वंतत्र राज्य त्यांचे स्वारस्य अबाधित राखते. सदर हक्क निसर्गतः समान, अविभाज्य, एकसंघ, अपारदर्शक, आंतर-स्वंतत्र व नैसर्गिक असतात. सदर हक्क मानवांचे मूलभूत हक्क आहेत.

संयुक्त राष्ट्रांनी सदर हक्क १९४८ मध्ये मानवाधिकारांच्या संयुक्त घोषणेने प्रस्थापित केले व सर्व जनतेसाठी सामान्य दर्जापर्यंत पोहोचण्यासाठी नोंदवून ठेवले. सदर घोषणापत्र १९६६ मध्ये नागरी व राजकरणी हक्कावरील दोन ग्रंथसंपदा व आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांन्वये आचरण्यात आणले आहेत.

मानवाधिकारांची संयुक्त घोषणापत्र व दोन ग्रंथसंपदांचे भारतीय अधिनियमांशी आपण तुलना केल्यास, आपणांस दिसेल की, मानवाचे भाग-३ मधील मूलभूत हक्क म्हणून सदर प्राथमिक हक्क सुद्धा आपल्या घटनेत नमूद आहेत व सदर हक्क जोपासणीचे तंत्र त्यात नमूद आहे. मानवाधिकारांची सुरक्षा पुढे अबाधित राखणेसाठी संसदेने मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ संमत केला व राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना केली व सांगितले की, प्रत्येक राज्यात राज्य मानव अधिकार आयोग असावा, त्यांचे नागरिकांच्या हक्क सुरक्षेचे उद्दिष्ट असावे. कायदा कलम २.१ (ड) मध्ये सुद्धा मानवाधिकाराची व्याख्या अशी आहे. “ भारतीय न्यायालयाने दिलेल्या व आंतरराष्ट्रीय संघटनेने अवलंबिलेल्या किंवा घटनेने हमी दिलेल्या नागरिकांच्या जीवन, स्वातंत्र्य, समता व सन्मानाशी संबंधित हक्क ”.

न्यायदानाचे प्रयत्नांस सहाय्यीभूत म्हणून व मानवाधिकाराचे संरक्षण करणेसाठी महाराष्ट्र शासनाने त्यांच्या गृहखात्याच्या (क्र.एचआसी-१०९९/२७८/पोल-१४) दिनांक १५ जानेवारी, २००० चे परिपत्रकान्वये राज्य मानव अधिकार आयोग स्थापण्याचे ठरवले आहे. महाराष्ट्र मानव अधिकार आयोगाने २००१ पासून कार्य करताना, मानव अधिकार संरक्षण कायदा कलम १२ अन्वये आपले कामकाज करण्यातील आपले सर्व उद्दिष्ट्ये गाठण्याचे प्रयास केले आहेत. आम्ही आमच्या २००५-२००६ सालचा अहवाल विधानसभेत ठेवण्यासाठी मानव अधिकार संरक्षण अधिनियम, १९९३ च्या कलम २८ अन्वये शासनास सदार करीत आहोत.

सध्याचे सदस्य २००६-२००७ साली रुजू झाले व अध्यक्ष २००७-२००८ साली आयोगामध्ये रुजू झाले. त्यानंतर या वार्षिक अहवालाचे शिल्लक राहिलेले काम प्राधान्याने हाती घेऊन ते पूर्ण करूण सादर करण्यात आले.

**न्यायाधीश श्री. क्षितीज व्यास**

(स्वाक्षरी)

अध्यक्ष

| **न्यायाधीश श्री. व्ही. जी. मुन्शी** | **श्री. टी. सिंगारवेल** | **श्री. सुभाष लाला** |
|---|---|---|
| (स्वाक्षरी) | (स्वाक्षरी) | (स्वाक्षरी) |
| सदस्य | सदस्य | सदस्य |

प्रकरण १

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी काम करते. जनहितासाठी काम करण्याची क्षमता आयोगाने सिद्ध केली आहे. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा हा पाचवा वार्षिक अहवाल असून दिनांक १ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २००६ या कालावधीकरिता आहे.

१.२. ज्याअर्थी माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ चे कलम २२ प्रमाणे अध्यक्ष व तीन सदस्य यांच्या नेमणुकीसाठी आदेशावर स्वाक्षरी केली. त्याअर्थी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची ६ मार्च २००१ रोजी स्थापना झाली. संयुक्त राष्ट्रसंघाने स्वतःच्या यंत्रणा, आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संस्थांकडून मानवी हक्कांचे संवर्धन, संरक्षण व अंमलबजावणी संपूर्ण विश्वात एकाच पद्धतीने ठरवून दिली. स्वदेशी राजनीतीप्रमाणे सदस्य राष्ट्रांकडून राजकीय वचनबद्धता सांभाळून मानवी हक्क यंत्रणेस स्वरूप देण्यात येत आहे.

१.३. यावर्षी, प्रभारी अध्यक्ष व तीन सदस्य अशा पूर्ण क्षमतेने आयोग कार्यरत होता. शासनाचे गृह विभागाचे राजपत्र क्रमांक एच.आर.सी. १०९९/३७८/पी-१४, दिनांक १५ जानेवारी २००० प्रमाणे आयोगाची स्थापना झाली. आयोग ६ मार्च २००१ पासून कार्यरत झाला.

१.४. आयोग स्वतःहून, मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यास किंवा तशी तक्रार प्राप्त झाल्यास, किंवा हक्कांचे उल्लंघन झालेल्या पीडिताने प्रार्थनापत्र दिल्यास किंवा एखाद्या व्यक्तीने मानवी हक्कांच्या उल्लंघनाविषयी किंवा उल्लंघनास मदत करण्याच्या विषयी तक्रार दिली असेल किंवा अशा प्रकारचे उल्लंघन रोखण्यासाठी शासकीय सेवकाने केलेल्या निष्काळजीपणाबद्दल तक्रार दिल्यास चौकशी करू शकते. मानवी हक्कांचे उल्लंघनासंबंधी कुठल्याही न्यायालयामध्ये प्रकरण प्रलंबित असेल तेथे न्यायालयाच्या परवानगीने मध्यस्थी करू शकते.

**रचना :**

१.५. माननीय प्रभारी अध्यक्ष श्री. ए. डी. माने, हे प्रभारी अध्यक्ष म्हणून कार्यरत राहिले. डॉ. व्ही. एस. चिटणीस, श्री. एम. आर. पाटील व श्री. सी.एल. थुल आयोगाचे सदस्य म्हणून कार्यरत राहिले.

१.६. आयोगाचे सचिव, श्री. अमिताभ चंद्र, आय.ए.एस. यावर्षी देखील सचिव म्हणून कार्यरत राहिले व अन्वेषण विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक म्हणून श्री. सुभाष आवटे, आय.पी.एस. हे बदली होईपर्यंत दिनांक ३१ मे २००५ पर्यंत कार्यरत राहिले व त्यानंतर श्री. सुनिल वैद्य यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक, अन्वेषण विभाग, म्हणून कार्यभार स्वीकारला आणि श्री. पी. आर. बेलोरकर आयोगाचे प्रबंधक म्हणून कार्यरत राहिले.

# प्रकरण २

## आयोगाने हाताळलेल्या तक्रारी :

२.१. हे आयोगाच्या कार्याचे पाचवे वर्ष आहे व आयोगाने हाताळलेल्या तक्रारीच्या स्वरूपावरून असे दिसते की, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या कार्याबाबत जनजागृती निर्माण झालेली दिसून येते. त्यामुळे आयोगाकडे तक्रारी घेऊन येणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढली आहे.

## सांख्यिकी माहिती :


२.२. सन २००५-०६ यावर्षी, आयोगास एकूण ५५८५ नवी प्रकरणे प्राप्त झाली आहेत. दिनांक १ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २००६ पर्यंतच्या वर्षभर एकूण ४००४ प्रकरणे निकाली काढली. त्यापैकी २४६६ प्रकरणे प्रथमदर्शी स्वरूपात निकाली काढली, संबंधित अधिकारी मंडळीकडून अहवाल प्राप्त झाल्यावर ४५५ प्रकरणे निकाली काढली. संबंधित अधिकारी मंडळीकडून अहवाल प्राप्त झाल्यावर व सुनावणी ऐकून घेतल्यावर ६९६ प्रकरणे निकाली काढली आणि आयोगाने ३८७ प्रकरणांमध्ये विविध विभागांस निर्देश आणि सूचना दिल्या आहेत.

२.३. चालू वर्षी असे दिसले की, गतवर्षीच्या २२०१ प्रकरणांची जर यावर्षी मिळालेल्या नव्या प्रकरणांबरोबर तुलना केली तर यावर्षी अंदाजे ५० टक्के वाढ झालेली आहे.

२.४. २००५-०६ यावर्षी, १०९ प्रकरणे आयोगाच्या अन्वेषण विभागाकडे तपासासाठी पाठविली व गेल्यावर्षीची तपासाधीन प्रकरणे १२२ होती. त्यांपैकी ८५ प्रकरणांमध्ये तपास पुर्ण करून आयोगास अहवाल सादर केला. यावर्षी १४६ प्रकरणे तपासाधीन आहेत.

२.५. २००५-०६ यावर्षी, आयोगाने स्वयंखुद्द प्रकरणांमध्ये स्वतःहून दखल घेतली.

तक्रारींचे प्रकारानुसार विभाजन खालीलप्रमाणे चित्रित केले आहे :—



**प्राप्त तक्रारींची संख्या व तक्रारीचे स्वरूप :**

२.६. आयोगाला प्राप्त झालेल्या ५५८५ तक्रारींचा विश्लेषणात्मक अभ्यास केला व त्यांचे खालील वर्गवारीच्या आधारावर विभागजन केले आहे.—

**कायद्याप्रमाणे आयोगापुढे चालणारी प्रकरणे:**

(१) पोलीस दलाविरुद्धच्या तक्रारी.— या तक्रारींमध्ये जास्त करून सामाविष्ट असलेल्या तक्रारी, पोलिसांकडून अधिकारांचा गैरवापर, गून्हा नोंद न करणे, खोट्या प्रकरणांमध्ये गुंतवणे, गैरकायदेशीर अटक, भ्रष्टाचार इ. प्रकारच्या तक्रारी—(१४०९ प्रकरणे)

(२) इतर शासकीय यंत्रणा.— ग्राम पंचाची. पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, महानगरपालिका व नगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य खाते, समाजकल्याण खाते इत्यादी या वर्णामध्ये मोडतात—(१०२८ प्रकरणे)

(३) मागासवर्गीय जाती जमाती व इतर अल्पसंख्याक यांच्यावर झालेल्या अन्यायाविषयीच्या तक्रारी—(११८ प्रकरणे)

(४) जनहिताशी संबंधित तक्रारी—(५४ प्रकरणे)

(५) कैद्यांचे मानवी हक्क उल्लंघनाबद्दलच्या तक्रारी—(२९ प्रकरणे)

(६) बाल हक्क उल्लंघनाबद्दलच्या आणि बालकामगार इत्यादीबाबत तक्रारी—(३२ प्रकरणे)

(७) वैद्यकीय निष्काळजीपणाबद्दलच्या तक्रारी—(३४ प्रकरणे)

(८) शिक्षण, शाळा व महाविद्यालयांबाबत विद्यार्थ्यांच्या मानवी हक्क उल्लंघनाच्या तक्रारी—(८२ प्रकरणे)

(९) असमर्थ व्यक्तींच्या तक्रारी—(२० प्रकरणे)

(१०) निवडणूक मतदारयादी संबंधीच्या तक्रारी—(१२ प्रकरणे)

(११) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मानवी हक्क उल्लंघनाबाबत तक्रारी—(६ प्रकरणे)

**कायद्याअन्वये आयोगाकडे न चालणाऱ्या तक्रारी :**

(१२) गुन्हेगारी संबंधीच्या तक्रारी—(३७२ प्रकरणे)

(१३) स्थानिक मंडळी, कंपनी, पेढी, खाजगी नोकरी देणारा संघटन इत्यादींच्या तक्रारी—(१४१ प्रकरणे)

(१४) सर्व्हिस ग्रॅज्युटी, पेन्शन इत्यादींच्या तक्रारी—(१४३ प्रकरणे)

(१५) कौटुंबिक कलहाच्या तक्रारी—(२०७ प्रकरणे)

(१६) जमिनी वादाबद्दल तक्रारी—(२५२ प्रकरणे)

(१७) बँकां संबंधीच्या तक्रारी—(६३ प्रकरणे)

(१८) खाजगी व्यक्तीविरुद्धच्या तक्रारी —(१३२२ प्रकरणे)

(१९) खाजगी नोकरीवर ठेवणारे मालक व कामगार विषयी तक्रारी —(१८२ प्रकरणे)

(२०) संकीर्ण स्वरूपाच्या तक्रारी —(२०२ प्रकरणे)

(२१) स्त्रियांच्या संबंधीच्या तक्रारी —(४१ प्रकरणे)

२.७. धक्कादायक गोष्ट अशी कि, जास्तीतजास्त प्रकरणे पोलीसदलाविरूद्धची आहेत, ही बाब गंभीरपणे लक्षात घेतली असून त्याबाबत पोलीस दल व जिल्हा पातळीवरील प्रशासनास प्रशिक्षण व त्याची जाणीव याकरिता आयोगाकडून कार्यक्रम आखण्यात येत आहे.

२.८. मोठया प्रमाणावर अशी प्रकरणे सुद्धा आयोगाला प्राप्त झाली, जी कायद्यान्वये आयोगाकडे चालणारी नव्हती. यावरून असे दिसते की, आयोगाचे अधिकार व कार्य याबद्दल जनमाणसांत माहितीची कमतरता आहे. यासमस्येला आळा घालण्यासाठी पाउले उचलली जात आहेत. आयोगाचे सदस्य जनजागृतीसाठी सुनावणी घेत आहेत. भेटी व व्याख्याने जिल्हा स्तरावर देत आहेत.

**आयोगाने स्वयंखुद्द दखल घेतलेली दखल :**

२.९. नित्यक्रमाच्या प्रकरणांमध्ये, आयोग फक्त पिडीत व्यक्तीकडून किंवा त्यांच्या हितचिंतकाद्वारे फिर्याद मिळाल्यानंतरच कार्यवाही करते, परंतु आयोगाला मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ अन्वये स्वतः होऊन किंवा स्वतः पुढाकार घेऊन मानवी हक्क उल्लंघनाच्या प्रकरणामध्ये चौकशी करण्याचे अधिकार दिले गेले आहेत. त्यानुसार आयोग स्वतः होऊन प्रकरणे हाताळतात तसेच पिडीत व्यक्ती स्वतः आयोगाकडे आल्यानंतरची प्रकरणे सुद्धा हाताळली जातात. या वर्षाच्या दरम्यान आयोगाने २६ प्रकरणांमध्ये स्वतः होउन दखल घेतली आहे.

**स्वयंखुद्द दखल घेतलेली प्रकरणे २००५-०६**

| अनु. क्र. (१) | केस नं. (२) | विषय (३) |
|---|---|---|
| १. | १/१४/०५-०६ | दिनांक ४ एप्रिल २००५ स्त्रियांचे शोषण, श्री. आप्पासाहेब सुतार यांचेकडील कात्रण. |
| २. | ३३/१६/०५-०६ | दिनांक १३ एप्रिल २००० मुलीचा गटारात पडून मृत्यू, इंडियन एक्सप्रेस ११/४/२००५. |
| ३. | ४४/१६/०५-०६ | मानवी सापळ्याचा हाताचा तुकडा पायाखाली आला. |
| ४. | ४४५/१६/०५-०६ | चौकीमध्ये पोलीसाचा तरूण मुलीवर बलात्कार, दि टाईम्स ऑफ इंडिया, तारीख २२ एप्रिल २००५. |
| ५. | १२३/१६/०५-०६ | प्रॉव्हिडंटचे फंडचे पैसे न दिल्याबद्दल, दि टाईम्स ऑफ इंडिया, तारीख ५ मे २००५. |
| ६. | ५/११/०५-०६ | कथित नक्षलवादी शंकर पेरीकुमार पोलीस गोळीबारात मारला गेला– इंडियन एक्सप्रेस, तारीख ५ मे २००५ |
| ७. | २४/१९/०५-०६ | दिनांक १३ जून २००५, मृत समजून शवागृहात पाठवलेला रोगी धक्क्याने मरण पावला. लोकसत्ता–तारीख ७ जून २००५. |
| ८. | ५५५/१६/०५-०६ | अपमान झालेला ए. सी. पी. आसीयु शिक्षा देतो, अँन्टॉप हिलचा रहिवासी एसीओ अरूण देसाई हा हवालदार बोलला म्हणून झोडला गेला. |


| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ९. | ५६६/१६/०५-०६ | मुलांच्या रिमांड होममध्ये तरूणांनी दंगल केली. मुंबई मिरर, दिनांक २ सप्टेंबर २००५. |
| १०. | ६५८/१६/२००५ | १९ सप्टेंबर २००५ हवालदारांनी नटांना शिवीगाळ केली म्हणून चित्रपट क्षेत्राने निषेध केला. दि टाईम्स ऑफ इंडिया, तारीख १६ सप्टेंबर २००५. |
| ११. | ११०/१७/२००५ | २१ सप्टेंबर २००५ पाच दिवस गेल्यानंतरसुद्धा पी. आय. खापा, यांच्यावर कारवाई केली गेली नाही. |
| १२. | ७७५/१६/२००५ | १९ ऑक्टोबर २००५ पोलीस, श्री. पवार यांचा मुलीवर बलात्कार, सहारा एअरपोर्ट, दिनांक १८ जानेवारी २००५, रोजी दि इंडियन एक्सप्रेस. |
| १३. | ३०२/३०/२००५ | पोलीस श्री. काझी, यांचा बार बालावर बलात्कार, दिनांक ११ ऑक्टोबर २००५ रोजी दि टाईम्स ऑफ इंडिया. |
| १४. | ९९५/१६/२००५ | शकाल जयस्वाल या कैद्याने पोलीस कोठडीमध्ये आयुष्य संपविले. मुंबई मिरर—२ डिसेंबर २००५. |
| १५. | १९/११/२००५ | गडचिरोलीमध्ये जातीय अन्याय, बापाला त्याच्या स्वतःच्या मुलाला विष्ठा खाऊ गालण्यासाठी विवश केले. सम्राट—१३ डिसेंबर २००५. |
| १६. | १२१०/१६/२००५ | शाळेत जाणाऱ्या मुलांची दयनीय स्थितीमुळे मी हे पत्र लिहिले. आर. जी. सुधाकर, तारीख १३ जानेवारी २००६. |
| १७. | १२६०/१६/०५-०६ मुंबई ११८१ | २० जानेवारी २००६ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माजी मुख्याध्यापकासंबंधी, लोकसत्ता, तारीख २० जानेवारी २००६. |
| १८. | ११२/३/२००५-०६ | अन्याय झाल्या बाबत मिलिंद आठवले यांची शपथ. आज आर. पी. आय. चा मोर्चा देशोन्नती, तारीख ३ जानेवारी २००६. |
| १९. | ४४/२/२००५ | दिनांक २५ जानेवारी २००६ श्री. मधुकर शिकरे यांच्या विष घेऊन मृत्युविषयी. तारीख १ जानेवारी २००६, ' लोकमत ', तारीख ९ जानेवारी २००६ अकोला |
| २०. | १०५/९/२००५ | बँक मॅनेजर विरूद्ध असंतोष ' देशोन्नती ', तारीख १२ जानेवारी २००६. |
| २१. | १२९८/१६/२००५-०६ | दिनांक ३० जानेवारी २००६ बालगृहामध्ये सिमेंट प्लांट, ' मुंबई मिरर ', तारीख १७ फेब्रुवारी २००६. |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| २२. | १४१५/१६/२००५ | १४ फेब्रुवारी २००६ वसतिगृहाचे छप्पर कोसळून कामगार लिंगया मंगर ठार, इंडियन एक्सप्रेस, तारीख १३ फेब्रुवारी २००६. |
| २३. | २४१/१७/२००५-०६ | दिनांक २० फेब्रुवारी २००६ वेड्याचे गृहातील दुरगामी कृकृत्याच्या चौकशीचे आदेश दिले. लोकमत टाईम्स, नागपूर, तारीख १९ फेब्रुवारी २००६. |
| २४. | १३२/३/२००५-०६ | दिनांक २२ फेब्रुवारी २००६ वडगांव राजदीत येथे किशोर भास्कर गायकवाड या विद्यार्थ्यास मारहाण, सकाळ, तारीख १३ फेब्रुवारी २००६. |
| २५. | १०४/८/२००५-०६ | दिनांक ७ मार्च २००० माजी मुख्याध्यापकाने विद्यार्थ्यांचे स्कॉलरशिपचे लाखो रूपये दिले नाही. माजी मुख्याध्यापक श्री. गणेश सुरेश वरणगांवकर. |
| २६. | १०८/२८/२००५-०६ | दिनांक १८ मार्च २००६ दलित स्त्रीला निर्वस्त्र केल्याने घरात जूलूम, दि इंडियन एक्सप्रेस, तारीख १७ मार्च २००६ |

**कोठडीतील मृत्यु प्रकरणे :—**

२.१०. चालू अहवालाच्या वर्षी आयोगाला एकूण २१५ कोठडीतील मृत्युबाबत प्रकरणांची माहिती प्राप्त झाली. त्या २१५ मृत्यूंपैकी १३७ मृत्यूंची माहिती न्यायालयीन कोठडीतीलमृत्यूसंबंधी होती. १९ मृत्यूंची माहिती भिक्षेकरीगृहाच्या होत्या, २५ बालगृहातील मृत्युविषयी होत्या, ३२ मृत्यु पोलीस कोठडीतील व २ मृत्यु कुष्ठरोगीगृहातील होते.

**कोठडीतील मृत्यूबाबतच्या प्रकरणांचे विभाजन खालील आलेखाप्रमाणे चित्रित केले आहे.**



## प्रकरण ३

### अटक उपसमितीचे अधिकार :

जीवनाचा व वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क घटनेतील कलम २१ द्वारे स्थापित केला आहे.त्यामध्ये मानवी प्रतिष्ठेचे जीवन जगण्याचा अधिकार आहे आणि राज्यशासन व त्याचे अंमलदारापासून छळ व हल्ला यांच्याविरूद्ध हमी दिलेली आहे. घटनेतील कलम २२ मध्ये काही परिस्थितीमध्ये अटकेपासून व कैदेत ठेवण्यापासून संरक्षणाची तरतूद आहे. या संविधानिक संरक्षकांबरोबरच काही वैधानिक तरतुदी वैयक्तिक स्वातंत्र, प्रतिष्ठा व नागरिकांच्या मूलभूत मानवी हक्कांचे संरक्षण करतात.

३.२. माननीय उच्चतम न्यायालयाने डी. के. बासु विरूद्ध पश्चिम बंगाल राज्य, अे. आय. आर. १९९७ सर्वोच्च न्यायालय, ६१० मध्ये निरिक्षण केले आहे.

संविधानाच्या कलम २१ प्रमाणे हमी दिलेली महत्त्वपूर्ण हक्क, खटला चालत असलेला गुन्हेगार, अटकेमध्ये असलेला व तुरुंगातील इतर बंदी, यांना नाकारता येत नाही. फक्त कायद्याने काही वाजवी बंधने घालून दिली आहेत ती सोडून कुठल्याही प्रकारचा छळ किंवा निर्दयीपणे, अमानवी व अपमानास्पद वागणूक घटनेतील कलम २१ च्या कक्षेत येत नाही. मग ते चौकशीच्यावेळी, विचारपूस करतेवेळी किंवा दुसऱ्याप्रकारे असो कारवाईमध्ये पारदर्शकता व जबाबदारी हे दोन शक्यतो संरक्षणात्मत उपाय आहेत. त्यांच्यावर न्यायालयाने भर दिला आहे.

३.३. उच्चतम न्यायालयाने ही ध्येय साध्य करण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे घालून दिलेली आहेत. व्यक्तीची अटक करतांना त्याचे पालन होऊ शकेल.

सर्वोच्च न्यायालयाने, डी. के. बासू, प्रकरणामध्ये इतर वैधानिक सुरक्षिततेसह जे अकरा मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत त्यांचे बरोबर पालन होण्यासाठी व प्रकरणांचे पुढे योग्य निरिक्षण केले जाईल याची निश्चिती करण्यासाठी व त्याचे तंतोतंत पालन होण्यासाठी आदेश दिला की, हे काम मानवी हक्क आयोग, जे बऱ्याच राज्यात स्थापन केलेली आहेत, त्यांना देण्यात यावे. असेही आदेश देण्यात आले की, मानवी हक्क आयोगामध्ये उप समित्यांची स्थापना व्हावी, ज्यामुळे हे निरिक्षण केले जाईल की, या ११ मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता केली जात आहे की नाही व पुढची आवश्यक कार्यवाही केली जाईल, ज्यामुळे याची निश्चिती केली जावी की या ११ मार्गदर्शक तत्वांची पर्तता केली जात आहे.

३.४. उच्चतम न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने उप समितीची स्थापना केली आहे. ज्यामुळे माननीय उच्चतम न्यायालयाचे ११ निर्देशांचे पालन होण्यासाठी लक्ष ठेवले जाईल.

**उपसमितीची रचना :—**

३.५. **उपसमितीचे माननीय सदस्य खालीलप्रमाणे :-**

(१) श्री. एम. आर. पाटील, :— उपसमितीचे अध्यक्ष

(२) डॉ. व्ही. एस. चिटणीस, :— सदस्य

(३) श्री. सी. एल. थुल, :— सदस्य

(शा.म.मु.) वाय १२७२-४ (१०००-१२-२००९)

**पोलीस ठाण्यांना अचानक भेटी, निरीक्षणाचा सारांश व शिफारस भेटी :—**

३.६. उच्चतम न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे उप समितीचे मुख्य कार्य डी. के. बासु, विरूद्ध पश्चिम बंगाल राज्य या प्रकरणामध्ये जे सुप्रीम कोर्टाने आदेश दिले आहेत त्याचे पालन होत आहे याचे निरिक्षण करणे व राज्यातील पोलीस ठाण्यांना भेटी देऊन पालन होते काय त्याची जागीच निश्चिती करणे. या आदेशाप्रमाणे उप समितीने आपले कार्य केले आहे व कित्येक महाराष्ट्रातील पोलीस ठाण्यांना भेटी दिल्या आहेत. २००५-०६ वर्षी, पोलीस ठाण्यांना भेटी दिल्या गेल्या आहेत.

३.७. भेटीच्या दरम्यान, अटक, वैद्यकीय परीक्षा, अटक व्यक्तीची माहिती त्याच्या नातेवाईकांना दिल्याबद्दल इत्यादी गोष्टी तपासल्या गेल्या. अटक ममो जसे माननीय सुप्रीम कोर्टाच्या दृष्टीत आहे त्याप्रमाणे तपासला गेला, त्यावर अटक व्यक्तीची स्वाक्षरी केलेली आहे व साक्षीदाराने साक्षीत केलेला असून अटक करणाऱ्या अधिकाऱ्याने स्वाक्षरी केलेली आहे.उप समितीने केलेले निरिक्षण व शिफारशी थोडक्यामध्ये खालीलप्रमाणे आहेत :—

| अनु. क्र. (१) | पोलीस ठाण्याचे नांव (२) | जिल्हा (३) | भेटीची तारीख (४) | ज्या सदस्याने भेट दिली तो (५) |
|---|---|---|---|---|
| १. | भोसारी | पुणे | १७/४/०५ | माननीय सदस्य, श्री. एम. आर. पाटील |
| २. | फुलउमबरी | औरंगाबाद | ३/५/०५ | माननीय सदस्य, श्री. एम. आर. पाटील |
| ३. | महुली जहागिर | अमरावती | ४/६/०५ | माननीय सदस्य, श्री. एम. आर. पाटील |
| ४. | लोणावळा पो. ठाणे | पुणे | ११/६/०५ | माननीय सदस्य, श्री. एम. आर. पाटील |
| | | | १२/६/०५ | |
| ५. | भद्रावती | चंद्रपूर | २९/६/०५ | माननीय सदस्य, श्री. एम. आर. पाटील |
| ६. | वरोरा | चंद्रपूर | २९/६/०५ | माननीय सदस्य, श्री. एम. आर. पाटील |
| ७. | फुलउमबरी | औरंगाबाद | ३/९/०५ | माननीय सदस्य, श्री. एम. आर. पाटील |
| ८. | चंद्रपूर व फाझेरपुरा | अमरावती | १२/९/०५ | माननीय सदस्य, श्री. एम. आर. पाटील |
| ९. | अंबाझारी पोलीस ठाणे | नागपूर | १८/९/०५ | माननीय सदस्य, श्री. एम. आर. पाटील |
| १०. | हवेली पोलीस ठाणे | पुणे | २३/९/०५ | माननीय सदस्य, श्री. एम. आर. पाटील |
| ११. | बंदगार्डन | पुणे | २४/९/०५ | माननीय सदस्य, श्री. एम. आर. पाटील |
| १२. | कलम्ब | यवतमाळ | ३०/९/०५ | माननीय सदस्य, श्री. एम. आर. पाटील |

निरीक्षणे व शिफारशी :—

| अ. क्र. (१) | पोलीस ठाण्याचे नाव (२) | तारीख (३) | निरीक्षण (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| १. | मुरूड | २८/५/०५ | माननीय सदस्य डॉ. व्हि. एस. चिटणीस यांनी मुरूड पोलीस स्टेशनला, रायगडला भेट दिली व पाहिले की अटक व्यक्तीचे नाव नोंद केलेले नाही. | त्याप्रमाणे सूचना दिल्या. |
| २. | अंबाझारी | १८/९/०५ | उप समितीचे माननीय अध्यक्ष, श्री. एम. आर. पाटील यांनी अंबाझारी पोलीस ठाण्याला भेट दिली व निरीक्षण केल्यानंतर असे समजले की अटक मेमो बनविला नव्हता. | त्याप्रमाणे सूचना दिल्या. |
| ३. | वरोरा | २९/६/०५ | उप समितीचे माननीय अध्यक्ष, श्री. एम. आर. पाटील यांनी वरोरा पोलीस ठाण्याला भेट दिली. | त्याप्रमाणे सुचना दिल्या. |
| ४. | लोणावळा पोलीस ठाणे व बंदगार्डन पोलीस ठाणे लष्कर पोलीस ठाणे. | ५/६/०५<br>१७/१०/०५ | माननीय सदस्य डॉ. व्हि. एस. चिटणीस यांनी लोणावळा ग्रामीण पोलीस ठाणे व लष्कर पोलीस ठाण्याला भेटी दिल्या व पाहिले की सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे नोंदणी ठेवलेली नव्हती. | त्याप्रमाणे सुचना दिल्या. |
| ५. | हवेली पोलीस ठाणे | २३/९/०५ | उपसमितीने माननीय अध्यक्ष श्री. एम. आर. पाटील यांनी हवेली पोलीस ठाण्याला भेट दिली. पुणे व पाहिले की अटक मेमो जरी बनविला गेला पण तो छापील स्वरूपात नव्हता तो साध्या हाताने लिहिलेल्या स्वरूपामध्ये आहे त्यावर अटक व्यक्तीची व साक्षीदाराची स्वाक्षरी नव्हती. | सुधारासाठी कार्य करण्यासाठी सूचना दिल्या. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ६. | फुलउमरी | ३/५/०५ | उप समितीने माननीय अध्यक्ष श्री. एम. आर. पाटील यांनी फुलउमरी पोलीस ठाणे, औरंगाबादला भेट दिली व पाहिले की अटक मेमो बरोबर भरलेला नव्हता. | त्याप्रमाणे सूचना दिल्या. |

३.८. उप समितीच्या सर्व शिफारशी संबंधित पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्याना जागीच देण्यात आल्या. उपसमितीला त्रैमासिक अहवाल महाराष्ट्रातील सर्व जिल्हा पोलीस अधीक्षककाकडून प्राप्त होत आहेत व माननीय सुप्रीम कोर्टाचे ११ निर्देशांचे योग्य पालन होण्याचे निरीक्षण केले जात आहे.

## प्रकरण ४

## मानवी हक्कांच्या शिक्षण व जाणिवेबद्दल वाढ

मानवी हक्कांच्या शिक्षण व जाणिवेबद्दल वाढ करण्यासाठी आयोगाचे माननीय अध्यक्ष, न्यायमूर्ती ए. डी. माने यांनी एन. जी.ओ. महाविद्यालये व संघटना मार्फत महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या कार्यक्रमात कित्येक व्याख्याने दिली.

४.१. या संस्थांना त्यांच्या सुरूवातीच्या अपेक्षांबद्दल जाण झालेली नाही. तेथे अनुभवी कार्यकर्ते आहेत व इतरही साधने आहेत ज्यांचा या नव्या आयोगाला वापर करून घेता येईल. कायद्याचा व संस्थांच्या पूनेरचनेचा एक धडा असा आहे की, तुम्ही नवीन संस्था स्थापना करून किंवा नविन कायदा बनवून समस्याचे निवारण करणे आवश्यक नाही, खरे आवाहन आहे की, अशा संस्थेमध्ये दृष्टी, वचनबद्ध, उर्जा व प्रशासकीय इच्छा असणाऱ्या व्यक्तींची नेमणूक करावी, ज्यामुळे याची खात्री केली जाईल की या संस्था आपले अधिकार व जबाबदाऱ्या, ज्या त्यांना दिलेल्या आहेत त्या पूर्ण करतील.

मानवी हक्कासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या अधिकाराने जी कित्येक परिस्थितीजन्य कारणे ओळखून काढली आहेत ती मानवी हक्क आयोग जोरदारणे कार्य करण्यासाठी योग्य आहेत. पहिली विचारार्ह गोष्ट आहे स्वांतत्र्य हे स्वातंत्र्य कायदेशीर कार्यप्रणाली, आर्थिक स्वायतता, स्वच्छ नेमणुका करण्याच्या कार्यपद्धती व आयोगाची रचना यामुळे निश्चित केली पाहिजे. यासंबंधी असे सुचित करण्यात आलेले आहे की, आयेगावरील नेमणुकाची कस असा असावा कि, सदस्य यांनी मानवी हक्काचे संरक्षण व संवर्धन करण्यामध्ये कौशल्य व योग्यता सिद्ध केलेली असली पाहिजे.

दुसरी विचारार्ह गोष्ट, न्यायाधिकार क्षेत्र स्पष्टपणे आखणे व मुबलक अधिकारासंबंधी आहे. न्यायाधिकार क्षेत्रासंबंधी म्हटले तर अम्नेस्टी व दुसऱ्या टिकाकारांनी आयोगाच्या अधिकाराबद्दल काळजी व्यक्त केली आहे. कलम १३ब अन्वये मानवी हक्काचा अपराध गैर राज्य घटकांकडून असेल तर ते कृत्य पीटीआई अंतर्गत गुन्हा होतो. त्यासंबंधी तक्रारीची चौकशी करणे. तेथे काल्पनिक व व्यावहारीक संबंधाचा विचार केला गैला पाहिजे असे काही नाही.

तिसरी विचारार्ह गोष्ट आहे सुलभता, यामध्ये ही जाणीव आहे की संस्थेला व्यक्तीशः भेटू शकतो. व या जाणीवेची निश्चितता की आयोग समाजाच्या सर्व सभ्य घटकांचे प्रतिनिधित्व त्याच्या रचनेतून करेल. याविषयी आयोगाच्या प्रादेशिक उप-आयोगाची स्थापना व प्रादेशिक व जिल्ह्यामध्ये कार्यालये उघडण्याचा विचार केला पाहिजे.

चौथी विचारार्ह गोष्ट आहे सहकार्याची गरज, आयोगाने सहकार्याचे नाते परस्पर शासकीय संस्थामध्ये वाढविण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. दुसऱ्या राष्ट्रीय मानवी हक्क आयोग व संबंधित संस्था व अशासकीय संगठना ज्या परस्पर मानवी हक्काच्या संवर्धन व संरक्षणाबद्दल संबंधित आहेत.

पाचवी विचारार्ह गोष्ट आहे कार्यकारी कार्यक्षमता, त्यामध्ये पुरेपुर आर्थिक तरतूद व निःपक्षपाती, कार्यक्षम नेमणूक करण्याची क्षमता यांचा समावेश होतो. आयोगाने स्वतःच्या कार्याच्या रीती, कार्यपद्धतीचे नियम, ज्यामुळे कार्यकारी क्षमता वाढवावी, ग्रहण केले पाहिजेत.

बेलोरकर यांनी दिनांक ९ मार्च २००४ रोजी आयोगाचे प्रबंधक म्हणून कार्यभार सांभाळला.

जागा :-

५.३. महाराष्ट्र शासनाने शा.नि. क्र. एच.आर.सी. १०९९/३७८/पोल:१४, दिनांक १५ जानेवारी २००० द्वारे नमूद केले की, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे मुख्यालय मुंबई येथे असेल. त्याप्रमाणे शासनाने कित्येक जागा देऊ केल्या ज्यामध्ये न्यू ॲडमिनिस्ट्रेटीव बिल्डींग, मंत्रालयासमोर, वरळी गव्हर्नमेंट ट्रांसपोर्ट सर्विस, अरूण चेंबर्स ताडदेव, मुंबई, न्यू ॲडमिनिस्ट्रेटीव बिल्डींग, बांद्रा (पूर्व) व ओल्ड कस्टम हाऊस, मुंबई येथे दिल्या किंवा देऊ केल्या. शेवटी, परिपत्रक क्र. जीए./११.०१/सी.एन.१५/२००१/२२ तारीख २० जून २००२ प्रमाणे शासनाने २३८० चौरस फुट जागा ॲडमिनिस्ट्रेटीव स्टाफ कॉलेज बिल्डींग, ९, हजारीमल सोमानी मार्ग, सी.एस.टी. समोर, मुंबई ४०० ००१, येथे आयोगाला दिली, ती पूर्वी स्टेट फायनान्स आयोगाने व्यापली होती. आयोग त्याच जागेमध्ये कार्य करीत आहे.

साधने :-

५.४. २००५-०६ दरम्यान, राज्य सरकारने रुपये १ करोड ४० लाख ०९ हजार रुपयांचे अनुदान उपलब्ध केले, तर सर्व खर्च रुपये १ करोड २९ लाख ९ हजार झाला. त्याच्यापैकी ८६,८४,३२० वेतन व भत्ता यांच्यावर खर्च करण्यात आला आहे.

प्रकरण ६

उदाहरणदाखल आयोगाने निर्णय दिलेले काही प्रकरणे :-

**१) प्रकरण नं. २१९३/२००४/१०८१२**

तक्रारदार :-श्री. बापुराव गोपाळराव कंहेकर

प्रतीवादी :-सचिव, पाटबंधारे खाते, मंत्रालय, मुंबई

गणसंख्या :-एक न्यायासन

**तक्रारीचा प्रकार :-** तक्रारदार शासनाच्या सेवेतून निवृत्त झाला होता व त्याचे असे गाऱ्हाणे आहे की त्याला निवृत्ती वेतन व इतर फायदे दिलेले नाहीत.

**आयोगाने केलेली कार्यवाही :-** आयोगाने प्रतीवादाकडून सचिव, पाटबंधारे खाते, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून अहवाल मागविला. आयोगाला तारीख १७ जून २००५ रोजी सादर केलेल्या अहवालात असे सांगितले की सदर खात्याला योग्य दस्ताऐवज आवश्यक आहेत, की ज्यावर भ्रष्टाचार विरोधी कार्यालयाने छापा मारून सील केले आहेत. त्याचप्रमाणे खात्याला असेही सुचित केले की, त्याचे निवृत्ती वेतनाचे मूल्यांकन करता आले नाही.

**आयोगाचा निर्णय :-** आयोगाला त्याच्या ३१ मार्च २००५ रोजी निवृत्तीनंतर पूर्णपणे लाभ न देण्याचे कुठलेही कारण दिसून आले नाही. ही एक खेदजनक बाब आहे की त्याचा पगार सुद्धा निश्चित केला गेला नाही जरी तो १२ वर्षे निलंबित केला गेला होता. फाईल भ्रष्टाचार विरोधी कार्यालयाकडे अर्निणित होती व निवृत्ती वेतन त्याच्या पात्रतेप्रमाणे असेल. आयोगाने आदेश दिले की संबंधित खात्याने कार्यवाही करावी व कृती अहवाल आठ आठवड्यामध्ये पाठवावा.

या आदेशाने प्रकरण संपुष्टात आणले गेले.

**२) केस नं. ३५१४/२००४-०५/१०८११**

तारीख :-४ फेब्रुवारी २००५

तक्रारदार :-श्री. आनंद शेरखाने

प्रतीवादी :-(१) चिटणीस, पाटबंधारे खाते, मंत्रालय, मुंबई (प्रभारी अधीक्षक, कर्ज वसुली लवाद)

गणसंख्या :-एक न्यायासन

**तक्रारीचे स्वरूप:-** दिनांक ४ फेब्रुवारी २००५ रोजी कर्ज वसुली अधिकारी, कर्ज वसुली लवाद, औरंगाबाद यांचे कथीत मानवी हक्क उल्लंघन होऊन जाती आधारीत छळ व अपमान ते मागासवर्गीय जातीचे असल्याने झाल्याची फिर्याद प्राप्त झाली.

**आयोगाने केलेली कार्यवाही :-** आयोगाने अध्यक्ष, कर्ज वसुली लवाद तसेच प्रबंधक कर्ज वसुली लवाद्यांकडून ३ मार्च २००५ रोजी अभिप्राय व अहवाल मागविला. दोन्ही प्रतीवादीनी त्यांचा अनुक्रमे अहवाल सादर केला.

**आयोगाचा निर्णय :-** आयोगास असा आदेश देणे योग्य वाटले की हे प्रकरण राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे निर्णयासाठी पाठवावे कारण तक्रारदाराने गंभीर आरोप फिर्यादीमध्ये केला आहे. यात संशय नाही कि ते प्रतिवादीने नाकारले आहेत. राज्य आयोगाच्या हे प्रकरण कार्यकक्षेत बसत नाही. आयोगाच्या प्रबंधकाने निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी असा आदेश देऊन केस संपुष्टात आली.

३) **केस नं.:-१०३/१७/०५/१४३२**

तक्रारी :- श्री. किरण देवरावजी पाटील

प्रतीवादी :- (१) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
(२) अधीक्षक, हॉस्पिटल मार्ग, एच.एस.पी.

गणसंख्या :- एक न्यायासन

तारीख :-२ मार्च २००६.

**तक्रारीचे स्वरूप :-** हे एका नवजात जन्मलेल्या बालकाच्या मानवी हक्क उल्लंघनाचे प्रकरण आहे. तक्रारदाराची बायको प्रसुतीसाठी हॉस्पिटलमध्ये दाखल केली गेली. व तिने एका नवजात मुलीस जन्म दिला. पण ते बालक अपरिपक्व होते. नवीन जन्मलेला बालक ऑपरेशन झालेली केस म्हणून गरमीवर ठेवण्यात आले व तेथे सेवा करीत असलेल्या परिचारीकेने बाळावर लक्ष ठेवण्यास निष्काळजीपणा केला, परिणामतः ते बाळ जळल्यामुळे जखमा झाल्यॉ, मूल कायमचे दुर्बल झाले.

**आयोगाने केलेली कार्यवाही :-** संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई तसेच हॉस्पिटलच्या अधीक्षक यांना सूचना दिल्या गेल्या. सूचनेला प्रतिसाद म्हणून प्रतिवादाने अहवाल सादर केला व असे सादर केले गेले की, डॉक्टरांची समिती लापरवाहीच्या प्रकरणामध्ये चौकशी करून सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्यासाठी स्थापन करण्यात आली.

**आयोगाचा निर्णय :-** आयोगाने शिफारस केली की संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई महाराष्ट्र शासन, यांनी तक्रारदाराला दोन लाख रुपये सहा आठवड्यामध्ये देऊन कृतीपालन केल्याचा अहवाल आयोगाला दोन आठवड्यामध्ये सादर केला जाईल.

४) **केस नं. ११३८/१६/२००५**

तक्रारी-श्रीमती सुनंदा तुकाराम सकरे

पिडीत व्यक्तीचे नाव :- तक्रारदाराची मुलगी श्रीमती सुजाता निकाळजे

प्रतिवादी :- पोलीस आयुक्त, मुंबई

आदेशाची तारीख :-२४ जानेवारी २००६.

गणसंख्या :- एक न्यायासन

**तक्रारीचे स्वरूप :-** फिर्याद पोलिसाविरुद्ध होती. अटक करतेवेळी पोलीसांनी सर्वोच्य न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वाचे करतेवेळी पोलिसांनी सर्वोच्य न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वाचे पालन केले नव्हते. तसेच पोलीसांकडून अकारण दिलेला त्रास व छळावाबत तक्रार.

**आयोगाने केलेली कार्यवाही :-** आयोगाने पोलीस उप-आयुक्तांना वस्तुस्थितीचा अहवाल तसेच संबंधीत सर्व दस्ताऐवज सादर करण्याचे आदेश दिले. श्री. धनजंय कमलाकर डी.सी.पी. मुंबई यांनी त्यांचा अहवाल १२ जानेवारी २००६ रोजी सादर केला. पोलीस निरीक्षक व सहाय्यक पोलीस आयुक्तांनी प्रतिज्ञापत्र सादर केले.

**आयोगाचा निर्णय :-** आयोगाने शिफारस केली की, श्री. विनायक कदम, ए.सी.पी. व श्री. नागेश लोहार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याविरुद्ध महाराष्ट्र शासनाने सर्वोच्य न्यायालयाच्या डी. के. बासू प्रकरणामध्ये दिलेल्या आदेशातील परिच्छेद ३६ प्रमाणे कडक विभागीय कार्यवाही करण्यात यावी. आयोगाने पुढे आयोगाच्या सचिवांना आदेश दिले की, या आदेशाची प्रत अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना धारा १८ (५) मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ प्रमाणे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

**५) केस नं. ३७४७/४०३९/४०५१/२००४-०५/१०८१४**

तक्रारदार :- (१) श्री. संजय अमरे व इतर

प्रतिवादी :- (१) मुख्य कार्यकारी अधिकारी, एस. आर. ए.

(२) आयुक्त, मुंबई महानगरपालिका.

(२) उप जिल्हाधिकारी, अतीक्रमण विभाग.

गणसंख्या :- एक न्यायासन

**तक्रारीचा प्रकार :-** फिर्याद बी.एम.सी. विरुद्ध असून, तक्रारदाराची घरे झोपडपट्टी पुर्नवसन योजनेअंतर्गत वाटप होण्याबद्दल आहे. तक्रारदारांच्या संस्थेला त्याची घरे तोडल्याने त्यांना राहण्यासाठी पर्यायी जागा म्हणून ट्रांजिस्ट कॅम्पमध्ये व्यवस्था केली होती. ते ट्रांजिस्ट कॅम्पमध्ये तात्पूरत्या स्वरूपात राहण्यासाठी गेले. तक्रारदार सांगतात की, संस्थेचे ५४ सदस्य गेल्या साडेचार वर्षापासून ट्रांजिस्ट कॅम्पमध्ये राहत आहेत. जरी ते एस.आर.ए. ने नवीन बांधलेल्या इमारतीमध्ये प्राधान्याने स्थायी घरे मिळण्यासाठी सूचीप्रमाणे हक्कदार आहेत. तक्रारदाराचे असे म्हणणे आहे की जवळपास ८० घरे देण्यासाठी तयार आहेत.

**आयोगाने केलेली कार्यवाही :-** आयोगाने ही बाब लक्षात घेऊन प्रतिवादीना सूचना दिल्या. आयोगानी प्रतिवादीना त्यांचे अहवाल तसेच घरे तोडल्याची प्राधान्य सूची सहीत सादर करण्याचे आदेश दिले.

**आयोगाचा निर्णय :-** प्रत्येक सदस्य ज्यांचे नांव घरे तोडण्याच्या प्राधान्य सूचीमध्ये दिसते त्याला घर दिले पाहिजे व कोणताही अन्याय त्यांच्यावर होऊ देऊ नये.

आयोगाने शिफारस केली की तोडण्याची प्राधान्य सूची जी आयोगाला सादर केलेली आहे त्याप्रमाणे एस. आर. ए. ने कृती करावी.

**६) केस नं. २१४९/२००४/१०९४०**

तक्रारीची तारीख -६ ऑक्टोबर २००४

तक्रारी - श्री. दहात्रय मुरलीधर चव्हाण

प्रतिवादी :- पोलीस आयुक्त, नाशिक

गणसंख्या - एक न्यायासन

**तक्रारीचे स्वरूप** - तक्रारदाराने दिनांक ६ ऑक्टोबर २००४ च्या तक्रारीमध्ये त्याला पंचवटी पोलीस ठाण्यामध्ये खोट्या प्रकरणात फसविल्याची तक्रार दिली. त्याने सांगितले की दोन पोलिसांनी गैर कानूनी पद्धतीने अवैध मागणी केली. त्यामुळे त्याने भ्रष्टाचार विरोधी विभागाकडे फियाद दिली. त्याप्रमाणे त्यांना अटक झाली. तक्रारदाराच्या मते पंचवटी पोलिसांनी त्याचा त्याच्या बायकोचा व मुलाचा छळ केला. तक्रारदार सांगतो की, त्याला खोट्या आरोपावर अटक केली. व तो आदेश शासनाने रद्द केला, अशाप्रकारे हे प्रकरण छळाविरुद्ध आहे.

**आयोगाने केलेली कार्यवाही :-** प्रतिवादींना सूचना देऊन त्यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला. त्याला प्रतिसाद म्हणून पोलीस आयुक्त, नाशिक यानी अहवाल सादर केला. तक्रारदाराने अहवालावर प्रत्युत्तर दाखल केले.

**आयोगाचा निर्णय :-** आयोगाने शिफारस केली की, पोलीस आयुक्त, नाशिक यांनी चौकशी अधिकाऱ्याला तक्रारदाराच्या पत्नीचा पुरवणी जबाब नोंद करावा तसेच पुढील पुरावा जर असेल. तर गोळा करण्यासाठी सूचना द्यावा. व समाधान झाल्यावर पुरवणी आरोपपत्र दुसऱ्या गुन्ह्यासाठी जर प्रथमदर्शनी आवश्यक असेल तर सादर करावे.

**७) केस नं. २३५४/२००४/११०३३**

तक्रारीची तारीख- ३० जून २००५

तक्रारदार- श्री. सुर्यकांत महादेव पाढरकामे

प्रतिवादी :- जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग,
पोलीस अधिक्षक, रायगड

गणसंख्या -एक न्यायसन

**तक्रारीचा प्रकार :-** ही फिर्याद पोलिसांविरुद्ध आहे. पोलीस उप निरीक्षक श्री, शशीकांत सावंत, श्रीवर्धन पोलीस ठाणे यांनी हल्ल्याची फिर्याद योग्यपणे नोंद केली नाही. उलट तक्रारदार व त्याचे साथीदार यांना पोलीस उप निरीक्षक यांनी धमकावले की त्यांना दोन वर्षे तुरुंगवास होईल अशा आरोपामध्ये टाकले जाईल.

**आयोगाने केलेली कार्यवाही :-** आयोगाने सूचना दिली व पोलीस अधीक्षक रायगड यांचेकडून अहवाल मागविला. त्याला प्रतिसाद म्हणून रायगड पोलीस अधिक्षकानी त्यांनी दिनांक १६ मार्च २००५ ला प्रत्येक आरोपाचे उत्तरासहीत टिप्पणी सादर केली. आयोगाने प्रकरणाची सुनवाई निश्चित केली.

**आयोगाचा निर्णय :-** आयोगाने शिफारस केली की, जिल्हाधिकारी रायगड हे तक्रारदाराला व त्याच्या वडील भावाला परवाना देण्याचा पुर्नविचार करतील. तसेच जिल्हाधिकाऱ्यांना कृती अहवल आयोगाला चार आठवड्यामध्ये सादर करण्याचे आदेश दिले.

८) **केस नं. ७७/३/२००५/१९५२**

तक्रारीची तारीख - १४ मार्च २००६

तक्रारदार - डॉ. नलिनी शामकांत भरडे

प्रतिवादी :-(१) कुलगुरू, आरोग्य विद्यापीठ, नाशिक

(२) प्राचार्य, पंडीत जवाहरलाल मेमोरियल इंस्टिट्यूट ऑफ होमिओपॅथी मेडीकल कॉलेज, बडनेरा रोड, स्टेशन, अमरावती.

(३) आयुक्त, रिजिनल प्रोव्हिडंट फंड, नागपूर

गणसंख्या प्रकार - एक न्यायासन

**तक्रारीचा प्रकार** - तक्रारदाराला अन्यायपूर्वक योग्य वेतन व पद न दिल्याबद्दल ही तक्रार आहे. तक्रारदार होमिओपॅथीमध्ये पदविका प्राप्त होता, व १९७६ मध्ये जे.एन.एम.आय.एच.एम.एस. अमरावती कॉलेजमध्ये रूजू झाली तिच्याप्रमाणे १९७८ ते १९८५ दरम्यान ती प्राध्यापक होती व १९८५ ते १९९६ पर्यंत तिने वैद्यकीय अधीक्षक म्हणून काम केले व १९९९ पर्यंत तिने अधिव्याखाता म्हणून काम केले. तिला योग्य वेतन व पद न मिळाल्यामुळे अन्याय झाला.

**आयोगाकडून केलेली कार्यवाही** :-आयोगाने सुचना देऊन डॉ. ढाले व संस्थेचे प्राचार्य यांच्याकडून अहवाल मागविला. सूचनेला प्रतिसाद म्हणून प्राचार्य यांनी अहवाल सादर केला. कुलगुरू यांनीही त्यांचा अहवाल सादर केला.

**आयोगाचा निर्णय** :- आयोगाने प्रकरणावर निर्णय देऊन शिफारस केली की प्राचार्य, पंडीत जवाहरलाल नेहरू, मेमोरियल इंस्टिट्यूट ऑफ होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज, बडनेरा रोड, अमरावती यानी तक्रारीची वैद्यकीय अधीक्षक म्हणून नियुक्ती करावी तसेच वाढीव वेतन श्रेणी व पाठीमागील वेतन सप्टेंबर २००२ पासून देण्यात यावे. कृतीपालन केल्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.

**९) सुवो-मोटो प्रकरण क्र. ०२/२००४ व**

प्रकरण क्र. ५३७/२००४/१०३२

तक्रारदार :- डॉ. हरिश शेट्टी व इतर

प्रतीवादी :- (१) सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई

(२) शिक्षण संचालक, पुणे

(३) प्राचार्य, पार्ले विद्यालय फंड, नागपूर.

(४) प्राचार्य, बाळ मोहन विद्यालय, दादर (पश्चिम)

(५) प्राचार्य, राजा शिवाजी विद्यालय, दादर.

आदेशाची तारीख :- २७ जुन २००६

गणसंख्या :- एक न्यायासन

**तक्रारीचा प्रकार .–** मुंबई मधून काही शाळांतून शैक्षणिक प्रगतीनुसार मुलांचे विभाजन केले जाण्याचा प्रश्न तसेच त्यांच्या हक्काबाबतची तक्रार.

**आयोगाने केलेली कार्यवाही .–** आयोगाने मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन व शिक्षण संचालक, पुणे यांना सूचना दिल्या त्या सूचनेला प्रतिसाद म्हणून सचिव, शालेय शिक्षण खाते, मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचा अहवाल सादर केला.

**आयोगाचा निर्णय .–** आयोगाला वाटले की संथगतीने पुर्नरचनेचा प्रयास केल्यास प्रस्तूत व्यवस्थेतील श्रद्धा, नाते व संघटनेची रचना यामध्ये बदल करता येणार नाही. याच्याही पुढे, सदरचा प्रयास विशेषतः गरीब मुलांना अस्थिरतामुळे असुरक्षित बनवतात. बंद शाळा, बदली शिक्षक व सततचे कार्यक्रम या मुख्य मुद्यांना न सोडवता संपवितात. त्यापेक्षा, पुर्नरचनेच्या संघर्षाची गरज आहे, ज्यामुळे लोकांना मोठ्या प्रमाणावर संपूर्ण व्यवस्थेमध्ये बदल करण्यासाठी संघर्षामध्ये पुढे आणतात. मानवी हक्काचा ढाचा मागणी करतो की, शैक्षणिक साधने गरजेप्रमाणे सर्व जातीना पुरविली जावी, त्यामुळे हे निश्चित केले जाईल की, वेगवेगळ्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीवर व आर्थिक, सामाजिक व भावनात्मक क्षमता असणाऱ्या सर्वांना दर्जेदार शिक्षण मिळू शकेल. मानवी हक्क शिक्षणामध्ये समानता व दर्जासाठी संघर्ष पक्का करतो, कारण ते वरील सर्व मुद्दे एकत्र व एका ढाच्यामध्ये आणू शकतात. आयोगाने आशा केली की, शासनाने जे निरीक्षण केले आहे त्यावर पुर्ण लक्ष देईल, त्यामुळे मुलांना २१ व्या शतकामध्ये प्रगत होण्यासाठी तयार केले जाईल व त्यांना उच्च शैक्षणिक तंत्र व सामाजिक ध्येय, दर्जेदार सांस्कृतिक शिक्षण, जे आमच्या घटनाकारांनी इच्छिले होते, ते घेण्यासाठी सज्ज केले जाईल, असी अपेक्षा केली जात आहे की, शाळा शासनाच्या ठरावाचे पालन करतील, परंतु, अपेक्षा निर्माण करण्यासाठी शासनाचा प्रस्ताव पूर्ण केला नाही तर अपेक्षा संपुष्टात येतील. आयोगाने म्हणून शिफारस केली की शासनाने एक स्वंतत्र कार्यबळ स्थापन करून ठरावाचे पालन होते किंवा नाही यावर लक्ष ठेवले जाईल, याप्रकारे प्रकरण संपविले.

**१०) केस नं. १६९/१६/२००५/३२३**

तक्रारी .–सौ. सुनिता सिताराम साटम

प्रतिवादी .–आयुक्त, महानगरपालिका, मुंबई

आदेशाची तारीख .–१० जानेवारी २००६

गणसंख्या .– एक न्यायसन

**तक्रारीचा प्रकार** : तक्रारदाराचे गाऱ्हाणे असे होते की, तिच्याकडे बी.एम.सी. चा स्वंतत्र पाण्याचा नळ होता. तिला नियमित पाणीपुरवठा होऊ नये म्हणून तिचे शेजारी व महानगरपालिकेचे अधिकारी यांच्यात संगनमत होऊन तिच्या नळ जोडणीमध्ये बिघाड केला, म्हणून पाणीपुरवठा नियमित येत नाही.

**आयोगाने केलेली कार्यवाही .–**आयुक्तांना सूचना दिल्याने मुंबई महानगरपालिकेने आपला अहवाल सादर केला.

**आयोगाचा निर्णय.–**सहायक अभियंता, पाणी पुरवठा विभागाने मान्य केले की, बुस्टर पंम्प चौथ्या माळ्यावरून पहिल्या माळ्याच्या पातळीवर घेऊन जावा की, ज्यामुळे तक्रारदाराला नियमित पाणीपुरवठा होईल. तक्रारदाराला परंतु शंका आहे की, ही समस्या भविष्यामध्ये परत उद्भवणार. परंतु श्री. मदन, सहायक अभियंता यांनी आश्वासन दिले कि, दुरुस्ती करतेवेळी प्लंबरला सूचना दिल्या जातील की तक्रारदाराच्या पाणीपुरवठ्याला उपद्रव होऊ नये. आयोगाच्या मध्यस्थीने तक्रारदाराचे गाऱ्हाणे मिटविले गेले.

**११) केस नं. ३३०४/२००४-०५/१०८०२.**

फिर्यादे .—श्री. हनुमंतराव साहेब खांडेकर, जिल्हा सातारा.

प्रतीवादी .—(१) पोलीस महानिरीक्षक, मुंबई.

(२) पोलीस अधिक्षक, सातारा.

आदेशाची तारीख .— २४ जून २००५.

गणसंख्या .—एक न्यायासन.

**तक्रारीचा प्रकार.**— तक्रार तक्रारदाराच्या हरवलेल्या पित्याबद्दल होती, त्यांनी ग्राम पंचायतीची निवडणुक श्री. राजाराम तातोबा अनुते यांच्या विरुद्ध लढली होती. तक्रारदाराला त्याच्या पित्याचा मृत्यु राजाराम तातोबा याने केला आहे असा संशय आहे.

**आयोगाने केलेली कार्यवाही .**— आयोगाने सूचना दिली व प्रतिवादीकडून अहवाल मागविला. प्रतिवादीने आयोगाला अहवाल सादर केला आहे.

**आयोगाचा निर्णय.**—आयोगा संतुष्ट झाले की हे प्रकरण राज्य, गुन्हे अन्वेषण विभागाने चौकशी केली. म्हणून आयोगाला प्रकरणामध्ये न्याय देणे शक्य नाही.

आयोगाने शिफारस केली की, पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य यांनी हे प्रकरण राज्य गुन्हे अन्वेषण सी.आय.डी. ला चौकशीसाठी सहा आठवड्यामध्ये सुपूर्द करावे त्यांना कृती अहवाल आयोगाला सादर करण्यासाठी आदेश दिले.

**१२) केस नं. २६९५/२००४/१०६६२.**

तक्रारदार .—प्रकाश संभाजीराव नागटिळक, जिल्हा लातूर.

प्रतिवादी .—(१) जिल्हाधिकारी, लातूर.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर.

आदेशाची तारीख .— १५ जून २००५.

गणसंख्या .—एक न्यायासन.

**तक्रारीचा प्रकार** :- तक्रारदार मागासलेल्या जातीचा व दारिद्र्य रेषेखालील आहे. त्याचे शिक्षण एम.ए., एम. फिल, बी.पी.एड. आहे. जिल्हा निवड समिती, लातूर ने शारीरिक शिक्षकासाठी दिलेल्या सूचीप्रमाणे तो योग्य उमेदवार आहे. जाहिरातीमध्ये दिल्याप्रमाणे या पदासाठी तो योग्य उमेदवार होता. त्याचा नियुक्तीसाठी दावा जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तसेच शिक्षण अधिकारी व सचिव, जिल्हा नेमणूक समिती, जिल्हा परिषद, लातूर यांनी नाकारला.

**आयोगाने केलेली कार्यवाही .–** आयोगाने सूचना दिली व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडून अहवाल मागविला. त्या अहवालास प्रतिसाद देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अहवाल आयोगाला सादर केला.

**आयोगाचा निर्णय.–** सुनवाईच्या वेळी, श्री, कडू पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, लातूर व शिक्षण अधिकारी यांनी सादर केले की, तक्रारदाराचा दावा पुढील रिक्त पदावर नेमणुकीच्यावेळी जसे वर्गीकरणाप्रमाणे शिक्षक किंवा शारीरिक शिक्षक म्हणून नियुक्तीसाठी मान्य केला जाईल. त्यांनी असेही सादर केले की, भविष्यकाळी जागा खाली असण्याची लवकरच शक्यता आहे व त्याचा दावा पुढच्या उपलब्ध खाली जागेसाठी मान्य केला जाईल.

तक्रारदाराने ते मान्य केले. आयोगाने शिफारस केली की, तक्रारदाराचे प्रकरण निवड समितीच्या अध्यक्षसमोर ठेवले जाऊन पुढच्या उपलब्ध रिक्त जागेवर तक्रारदाराची नेमणूक शारिरीक शिक्षक म्हणून कुठल्याही जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये व्हावी व निर्देश दिले की, सहा आठवड्यामध्ये आयोगाला कृतीपालन केल्याचा अहवाल सादर करावा.

**१३) केस नं. .–४३३/२००३/१०४५०.**

तक्रारदार .–तुलसीराम आकोबा चौहाण, जिल्हा पुणे.

प्रतीवादी .– (१) जिल्हा न्यायाधीश, पुणे.

(२) जिल्हा पोलीस अधीक्षक, पुणे.

(३) कामगार आयुक्त.

आदेशाची तारीख .–९ जून २००५.

गणसंख्या .–एक न्यायासन.

**तक्रारीचा प्रकार.–** तक्रारदार बांधलेला कामगार असून श्री. पोपटराव बुरूंगाळे, गाव मालेगाव, तालुका बारामती यांच्याकडे कामाला होता.

**आयोगाने केलेली कार्यवाही .–**सूचना देऊन जिल्हा न्यायाधीश, पुणे यांच्याकडून अहवाल मागितला गेला. सूचनेला प्रतिसाद म्हणून जिल्हा न्यायाधीशानी १७ सप्टेंबर २००४ रोजी अहवाल सादर केला. पोलीस अधीक्षकानी सुद्धा अहवाल २२ सप्टेंबर २००३ रोजी सादर केला. तक्रारदाराने उत्तर दिले व सांगितले की त्याची तक्रार बांधलेल्या कामागाराविषयी नसून मजदुरी न दिल्याबद्दल आहे. त्याने कामगार आयुक्त, पुणे यांना तक्रार केली होती व लेबर कोर्टाला दावा दाखल केला होता. जिल्हा न्यायाधीशानी चौकशी केल्यावर असे समजले की, ही बांधलेल्या कामागराचे प्रकरण नव्हते.

**आयोगाचा निर्णय.–**आयोगाने शिफारस केली की, कामगार आयुक्त, पुणे यांनी चार आठवड्यामध्ये प्रार्थनापत्रावर निर्णय करावा व कृती केल्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.